Mata 24.03.20

# पुण्यातील वाहतूक पूर्ण थांबवली

## गर्दी वाढल्यामुळे पोलिसांकडून बळाचा वापर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'जनता कर्फ्यू'ला रविवारी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यानंतर सोमवारच्या सकाळीच पुणेकरांनी जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसह शहरात ठिकठिकाणी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरात विनाकारण गाड्यांची संख्या वाढल्याने अखेर पोलिस आयुक्तांनीच वाहनांवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला अन् पाठोपाठ संपूर्ण राज्यात संचारबंदी जाहीर झाल्याने पुण्यातील गर्दी पुन्हा ओसरली. येत्या ३१ मार्चपर्यंत खासगी वाहनांच्या वापरावर बंधने कायम राहणार असल्याने पुणेकरांना जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी पायपीटच करावी लागणार आहे.

जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी शहरातील संचारबंदीचा कालावधी सोमवारी पहाटे पाचपर्यंत वाढविला होता. त्यानंतर, संपूर्ण शहरात जमावबंदीचे आदेश कायम असले, तरी सकाळपासून नागरिकांनी ठिकठिकाणी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. प्रामुख्याने शहराच्या वेगवेगळ्या भागांतील भाजी मंडईमध्ये आणि इतर आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी झाली होती. शहरातील सर्व दुकाने आणि मॉल्स बंद असले, तरी रस्त्यावर येणाऱ्या वाहनांचे प्रमाण वाढले होते. करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी 'लॉकडाऊन'चे आदेश दिल्यानंतर नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडत असल्याने त्यांच्या हालचालींवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी दुपारी तीननंतर सर्व खासगी वाहनांवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय वाऱ्याच्या वेगाने शहरात पसरला आणि रस्त्यावरील गर्दी कमी होऊ लागली. दुपारनंतर पोलिसांनी गस्तही वाढवत विनाकारण बाहेर पडणाऱ्या वाहनचालकांना दम भरत घरी पाठवून दिले. शहरातील प्रमुख चौकांमध्ये दुपारनंतर अडथळे उभारून रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते.



पोलिसांनी सोमवारी दुपारनंतर शहरातील रस्त्यांवरील वाहतूक पूर्ण बंद केली. शिवाजी रस्त्यासह शहराच्या प्रमुख रस्त्यावर पोलिसांनी बॅरीकेड्स उभे केले होते.

### पोलिसांनी दिला 'प्रसाद'

शहरात सोमवारी सकाळी आणि दुपारच्या टप्प्यात जमावबंदीचे आदेश लागू असतानाही अनेक नागरिक घराबाहेर पडले होते. त्यापैकी काही नागरिक अत्यावश्यक सेवांसाठी ये-जा करत असले, तरी अनेक जण उगाच रस्त्यावर फिरून कायद्याचे उल्लंघन करीत असल्याचे लक्षात आल्याने पोलिसांनी विविध ठिकाणी अशांना लाठीचा प्रसाद दिला. पोलिसांनी वाहनचालकांवर उगारलेल्या लाठीची दृश्ये सोशल मीडियातून व्हायरल झाल्याने बहुसंख्य पुणेकरांनी दुपारनंतर वाहन बाहेर काढणे टाळले आणि घरीच थांबण्याला प्राधान्य दिले.

▶▶ सविस्तर वृत्त...पुणे प्लस

Prabhat 24.03.20

# पुणे-नगर, पुणे-सोलापूर बायपास 'लोक'डाऊन

## पोलिसांकडून वाहतूक बंदी : आदेशाचे पालन होत नसल्याने कारवाई

वडगावशेरी, दि. २३ (प्रतिनिधी) - पुण्यातील संचारबंदीचा परिणाम फारसा होत नसून रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी झालेली नाही. त्यामुळे वाहनांची वाहतूक थांबविण्याचा निर्णय पुणे पोलिसांनी घेतला आहे.

पुणेशहर व उपनगरात वाहनेही बाहेर काढता येणार नाहीत. त्यामुळे रस्त्यावरील गर्दी आणि वाहतूक थांबणार आहे. याबाबतची अधिकृत घोषणा केल्यानंतर लगेच अॅक्शन मोडमध्ये येऊन पोलिसांकडून नगर-पुणे महामार्ग व पुणे-सोलापूर बायपास बंद करण्यात आला आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम यांनी दिलेले आदेश चंदननगर पोलीस स्टेशनकडून पाळण्यात येत आहेत.

अनेक पोलीस स्टेशन अखित्यारमध्ये येऊन सध्या सगळे रस्ते मोकळे करत आहेत. जे नागरिक ऐकत नाहीत, अशांवर कडक कारवाई केली जात आहे.

यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसह, ओला, उबर अशा सेवाही बंद करण्यात आल्या आहेत. नागरिकांना त्यांची वाहने रस्त्यावर आणता येणार नाहीत.

राज्यातील नागरी भागांत संचारबंदी सुरू असली तरी अनेक अहमदनगर- पुणे व सोलापूर-पुणे जोडणार बायपासला येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना थांबून पुन्हा परत पाठवण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूक बंदी केल्यावर नागरिकांनी पोलिसांसोबत हुज्जत घातल्यास कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

फक्त अत्यावश्यक असलेल्या नागरिकांना वाहन चालवण्यास परवानगी आहे. लोकांनी संचारबंदी पूर्णपणे मनावर न घेतल्याचे मात्र अनेक चित्र बायपासमार्गावर दिसून येत आहे. पोलिसांना हे पाऊल उचलावे लागत आहे.



सिंहगड रोड: वीर बाजी पासलकर चौक येथे लोकांना येण्यापासून रोखण्यासाठी लोकांना सल्ले देत असताना पोलीस कर्मचारी.

Pudhari 24.03.20










**पोलिस फोर्स इन ॲक्शन** | वाहतूक बंद घोषित केल्यानंतरही नागरिक रस्त्यावर उतरल्याने पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. नाकाबंदी झुगारून निघालेल्या दुचाकीस्वारांना रोखताना वाहतूक पोलिस.

Lokmat 24.04.20



अत्यंत वर्दळीच्या असलेल्या आळंदी रस्त्यावरील विश्रांतवाडीच्या मुख्य चौकात पोलीस व त्यांच्या वाहनांव्यतिरिक्त कोणीही नव्हते.

# विश्रांतवाडी चौक झाला निर्जन

## पोलिसांकडून अचानक तपासणी : वाहनचालकांची दैना

लोकमत न्यूज नेटवर्क

**विश्रांतवाडी :** विश्रांतवाडी, लोहगाव, धानोरी, टिंगरेनगर, कळस आदी परिसरात लॉकडाऊनला बहुतांशी नागरिक सहकार्य करीत आहेत. पोलिसांकडून ठिकठिकाणी दिवसरात्र पहारा देण्यात येत असून रस्त्यावर येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. मात्र, काही ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करताना सोशल डिस्टन्सिंग पाळण्यात येत नाही. तर, काही भागात सकाळ-संध्याकाळ 'वॉकिंग'साठी व कुत्री फिरवण्यासाठी 'सुशिक्षित' नागरिकच अधिक घराबाहेर पडून लॉकडाऊनला हरताळ फासताना दिसतात.

एरवी अत्यंत गजबलेले लोहगाव, विश्रांतवाडी व धानोरी जकातनाका येथील मुख्य चौक ओस पडल्याचे दिसत आहे. लोहगाव-वाघोली रस्त्यावर संतनगरमध्ये पोलिसांनी अचानक बंदोबस्त लावून वाहनांची तपासणी केली. त्यामुळे या रस्त्यावरून विनाकारण फिरणाऱ्या वाहनचालकांची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली.

लोहगावच्या मुख्य चौकात एका खाजगी कंपनीकडून गरजूंना रोज संध्याकाळी जेवण देण्यात येते. यासाठी लांबच लांब रांग लागल्याचे, मात्र सोशल डिस्टन्सिंग पाळण्यात येत नसल्याचे दिसले. या ठिकाणी जेवण देताना खबरदारी घेणे आवश्यक आहे.

सकाळ-संध्याकाळ वॉकिंग करणारे नागरिक मुख्य रस्ते सोडून आडबाजूच्या रस्त्याने वॉकिंगसाठी जात आहेत. तर काही जण अशाच प्रकारे पाळीव कुत्र्यांना फिरवण्यासाठी रस्त्यावर येत आहेत. यामध्ये सुशिक्षित लोकांचाच अधिक समावेश असून त्यांना आवर घालणे गरजेचे आहे.

लोहगाव व धानोरी परिसरातील डोंगराकडे वॉकिंग करणाऱ्यांनी मोर्चा वळवला आहे. या लोकांवर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. पोलीस ठिकठिकाणी रस्त्यावर थांबून पहारा देत आहेत. लॉकडाऊनमध्ये बहुतांश नागरिक सहकार्य देत असून रस्त्यावर येणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आले.

Lokmat 22.04.20

# सोलापूर रस्त्यावरील पहारा कडक

## वाहन तपासणी : मांजरी फाटा चौकातील नाकाबंदी

लोकमत न्यूज नेटवर्क

**हडपसर :** हडपसर वाहतूक विभागाच्या वतीने पुणे-सोलापूर रस्त्यावर मांजरी फाटा, सासवड रस्त्यावर फुरसुंगी कमान, मगरपट्टा चौक, गणेश मंदिर चौक, ससाणेनगर चौक येथेही कर्मचाऱ्यांची गस्त सुरु असल्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी स्पष्ट केले.

मांजरी फाटा चौक येथे प्रत्येक वाहनाची तपासणी केली जात आहे. अत्यावश्यक सेवा वगळता इतरांवर कारवाई केली जात आहे. ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना कोरोना व्हायरसचा त्रास होऊ शकतो, यासाठी प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे, असे वारंवार सांगितले जात आहे. मात्र, अजूनही अनेकांची मानसिकता बदलली नसल्याची खंत वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त नागनाथ वाकुडे यांनी व्यक्त केली.

कोरोना व्हायरसचा संसर्ग रोखण्यासाठी प्रशासकीय पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत. मांजरी



मांजरी फाटा येथील चौकात नियमित केली जाणारी नाकाबंदी.

◆ वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली मांजरी फाटा येथे बंदोबस्त ठेवला आहे. वाहतूक पोलीस आणि पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी येथे तैनात आहेत. विनाकारण रस्त्यावर आले, अशा ५१ जणांवर १८८ नुसार कारवाई केली. त्यामध्ये ३८ दुचाकी, ६ तीनचाकी आणि ७ चारचाकी वाहनांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर म्हेत्रे, गणेश थोरात, मार्तंड जगताप, कैलास सपकाळ, अंकुश शिवणकर यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

उपबाजार आणि हडपसरमधील पं. जवाहरलाल नेहरू भाजी मंडईमागील चार दिवसांपासून बंद आहे. शहर आणि परिसरातील रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. मात्र, सोलापूर रस्त्यावर वैदूवाडी चौकातील वाहतूक शाखेसमर भाजीविक्रेते खुलेआम दिवसभर व्यवसाय करीत आहेत. त्यांच्यावर कारवाई का केली जात नाही, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

**Loksatta 04.04.20**

# संचारबंदीचे आदेश मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

## दोन दिवसांत दोन हजार वाहने जप्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे:** संचारबंदीचे आदेश लागू झाल्यानंतर शहरात अत्यावश्यक काम नसताना फिरणाऱ्या दुचाकीस्वारांवर पोलिसांनी कारवाई तीव्र केली आहे. गेल्या दोन दिवसांत पोलिसांनी १ हजार २८७ जणांना नोटिसा बजावल्या तसेच कलम १८८ अंतर्गत गुन्हे दाखल केले. शहरातील विविध रस्त्यांवर नाकाबंदी करुन १ हजार ९६० वाहने जप्त केली.

शहरातील विविध १२० चौकात पोलिसांनी नाकाबंदी केली असून आदेशाचा भंग करणाऱ्यांविरोधात कारवाई सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसात पोलिसांनी १ हजार ९६० वाहने जप्त केली आहेत.करोनाच्या संसर्गाला अटकाव करण्यासाठी पोलिसांनी शहरात जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत, तसेच विनाकारण फिरणाऱ्यां विरोधात तीव्र कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला. शहरातील पेट्रोल पंपचालकांना केवळ अत्यावश्यक सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पेट्रोल, डिझेल वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरोधात १९ पेट्रोल पंपचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

करोनाच्या संसर्गाला अटकाव करण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या चौकात नाकाबंदी केली आहे.विनाकारण फिरणाऱ्यां विरोधात पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे.नागरिकांनी आदेशाचे पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त डॉ. वेंकटेशम यांनी केले आहे.

लोकसत्ता Sat, 04 April 2020 https://epaper.loksatta.com/c/!

**Lokmat 21.04.20**

# लॉकडाऊनच्या काळात आतापर्यंत २७ हजार ८३४ वाहने जप्त

## उल्लंघन करणाऱ्या २८ हजारांहून अधिक नागरिकांना नोटिसा

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** जमावबंदी, संचारबंदीचे पालन न केल्यास आता पोलीस कारवाई थांबणार नाही. याउलट यापुढील काळात ती आणखी सक्त केली जाणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. लॉकडाऊन सुरु झाल्यापासून आतापर्यंत २७ हजार ८३४ वाहने जप्त करण्यात आली आहेत. तर संचारबंदीचे उल्लंघन करणाऱ्या ९ हजार ४३२ जणांवर कारवाई केली गेली आहे. याशिवाय कायद्याचे पालन न करणाऱ्या तब्बल २८ हजार ४२२ जणांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

लॉकडाऊनच्या काळात २ हजार ३८३ विशेष पोलीस अधीकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणेकरांकडून सातत्याने कायद्याचे उल्लंघन होत असून पोलिसांनी अशा बेशिस्तपणे वागणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उभारला आहे. गेल्या काही दिवसांपासून बेजबाबदारपणाने वाहतूक तसेच बाहेर पडणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अशी २७ हजार ८३४ वाहने जप्त करण्यात आली आहे. मॉर्निंग वॉकच्या निमित्ताने बाहेर पडणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असून पोलिसांनी त्यांना कायद्याच्या भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांवर विनामास्क फिरत असल्यामुळे त्यांना कारवाईला सामोरे जावे लागले आहे. आतापर्यंत ३७९ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय पोलिसांच्या आदेशाचे पालन न करता सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या २८ हजार ४२२ जणांना पोलिसांनी नोटिसा दिल्या आहेत. सातत्याने शिस्त पाळण्याचे आवाहन करुनदेखील नागरिक त्याकडे दुर्लक्ष करत असतील तर त्यांना जाणीव करुन देण्यासाठी याप्रकारे कारवाई करावी लागेल, असे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

**Lokmat 09.04.20**

# वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

## १२७९ जणांना दिल्या नोटिसा : ९५६ वाहने केली जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊन असताना देखील विनाकारण घराबाहेर पडणाऱ्या वाहनचालकांवर पुणे वाहतूक पोलिसांनी बुधवारी कारवाई केली. त्यात १२७९ जणांना नोटिसा पाठवल्या. तसेच ९५६ वाहने जप्त केली, अशी माहिती पुणे शहराचे वाहतूक पोलीस उपायुक्त डॉ संजय शिंदे यांनी दिली आहे.

कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी शहरात लॉकडाऊन केले आहे. या संचारबंदीच्या काळात नागरिकांना घराबाहेर पडण्यास मनाई केली आहे. तसेच विनाकारण फिरताना दिसल्यास अशा व्यक्तींना पोलीस समज देऊन पुन्हा घरी पाठवत आहेत. मात्र अनेकदा समज देऊनही वाहनचालक ऐकत नसल्याची तक्रार वाहतूक पोलिसांनी केली. यावर त्यांनी बेशिस्तपणे व अत्यावश्यक कारणाशिवाय शहरात फिरणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. बुधवारी केलेल्या कारवाईत एकूण २०६ जणांवर कारवाई करून १२७९ वाहनचालकांना नोटिसा दिल्या. तर ९५६ वाहने जप्त केली.

शहरात लॉकडाऊनचे आदेश दिल्यानंतर या कालावधीत केवळ अत्यावश्यक सेवेतील वाहने, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, तसेच वैद्यकीय सेवेसाठी पोलिसांकडून दिलेली पासधारक वाहने यांना ये जा करण्यासाठी सवलत दिली आहे. परंतु या व्यतिरिक्त अनेक वाहनचालक विनाकारण फिरताना दिसून आल्याने त्यांच्यावर कारवाई केली आहे.

तन्मय ठोंबरे



**दुचाकीचालकांवर कारवाई...!** फातिमानगर येथे दुचाकीचालकांवर कारवाई करताना पोलीस.

- वाहतूक पोलीस उपायुक्त डॉ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात १३ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे त्या चेक पॉईंटवर वाहनांची तपासणी केली जात आहे.
- बुधवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत गरज नसताना रस्त्यावर फिरणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक विभागाकडून कारवाई केली आहे.
- यापुढील काळात कोरोनाच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी घरातच थांबावे. अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये. वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी नागरिकांना केले आहे.

**Loksatta 22.04.20**

## संचारबंदीत दंड थकवणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे शहर परिसरात संचारबंदीचे आदेश मोडणाऱ्या दुचाकीस्वार तसेच मोटारचालकांवर कारवाई सुरू करण्यात आल्यानंतर अनेक जणांनी वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाईतील थकीत दंडाची रक्कम जमा न केल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांनी गेल्या दोन दिवसांत १४८२ वाहनचालकांवर कारवाई करून त्यांच्याकडून ६ लाख ७० हजार रुपयांचा थकीत दंड वसूल केला.

करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी शहरात वाहतूक तसेच संचारबंदीचे आदेश देण्यात आले आहेत. वाहतूक शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील वेगवेगळ्या भागात १०९ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली. अनावश्यक फिरणाऱ्या वाहनचालकांविरोधात भादंवि १८८ अनुसार कारवाई केली तसेच ज्या वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांकडून यापूर्वी करण्यात आलेल्या कारवाईचा थकीत दंड जमा केला नाही. अशांकडून थकीत दंडाची रक्कम वसूल करण्यात आली. गेल्या दोन दिवसांत वाहतूक पोलिसांनी १४८२ वाहनचालकांकडून ६ लाख ७० हजार ९०० रुपयांचा थकीत दंड वसूल केला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. शिंदे यांनी दिली.

**Loksatta 11.05.20**

# मजुरांच्या प्रवासी वाहतुकीसाठी पीएमपीकडून साठ गाड्या

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहरात अडकलेल्या परराज्यातील मजुरांना पुणे रेल्वे स्थानकापर्यंत सोडण्यासाठी पीएमपीकडून रविवारी साठ गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या. शहराच्या विविध भागातील मजुरांना या गाड्यांद्वारे प्रवासी वाहतूक करण्यात आली.

शहराच्या विविध भागात राहणाऱ्या एक हजार ३०० मजुरांना उत्तर प्रदेश येथे रविवारी विशेष रेल्वेद्वारे पाठविण्यात आले. या मजुरांची पुणे रेल्वे स्थानकापर्यंत प्रवासी वाहतूक करण्यासाठी पीएमपीने गाड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना पोलीस प्रशासन आणि महापालिकेने केली होती. त्यानुसार रविवारी १ हजार ३०० मजुरांसाठी पीएमपीने साठ गाड्या उपलब्ध करून दिल्याची माहिती पीएमपीचे वाहतूक व्यवस्थापक अनंत वाघमारे यांनी दिली.

लक्ष्मीनगर पर्वती येथील गजानन महाराज मंदिर चौकातून ३४ गाड्या, कोथरूड पोलीस स्थानक परिसरातील ७, सिंहगड रस्ता परिसरातील वडगांव उड्डाणपूल येथून तीन गाड्या तर राजाराम पूल येथून सहा आणि वारजे पूल येथून पत्रास गाड्या सोडण्यात आल्या. या सर्व गाड्या दुपार पाळीत देण्यात आल्या. दरम्यान, वेगवेगळ्या जिल्ह्यातून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या आणि टाळेबंदीमुळे शहरात अडकून पडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याची व्यवस्था जिल्हा प्रशासनाकडून करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वेगवेगळ्या भागातून स्वारगेट स्थानकात येणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएमपीतून प्रवास करण्यास परवानगी द्यावी, असे आदेश जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी दिले आहेत.

**Sakal 18.05.20**



शिवाजी रस्ता : वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या व त्यांच्या दंडाची रक्कम शिल्लक आहेत, अशा वाहनचालकांकडून मजूर अड्डा चौकामध्ये वाहतूक पोलिस दंड वसूल करत आहेत.

**Prabhat 20.05.20**



पुणे : येरवडा परिसर प्रतिबंधात्मक असल्याने अशोकनगर बनसोडे चौकातून वाहनांना येण्या-जाण्यासाठी ठेवलेला मार्ग सामान्य नागरिकांसाठी बंद केला आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहनेच आता येथून सोडण्यात येणार आहेत.

**Prabhat 28.05.20**

## दुचाकी वाहनांवर कारवाई



रेड झोनमध्ये असलेल्या कात्रज कोंढवा भागात अनेक नागरिक रस्त्यावर आपली वाहने घेऊन येत आहेत. अशा वाहनांवर पोलिसांकडून कडक कारवाई करण्याबरोबरच त्यांच्याकडून दंड वसूल केला जात आहे.

**Pudhari 15.05.20**

## पोलिसांची कारवाई सुरू...



Prabhat 19.06.20

# चतु:शृंगी विभागाकडून वाहतुकीत बदल

**पुणे, दि. १८** - मुंबई-बेंगळुरु राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर पाषाण रस्ता येथे उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. यामुळे पुढील आदेशापर्यंत प्रायोगिक तत्त्वावर चतु:शृंगी वाहतूक विभागाकडून वाहतुकीत बदल केले आहेत. याबाबत वाहतूक शाखेचे अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी आदेश दिले.

पाषाणकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक सुस पुलाच्या अलीकडे उजवीकडे वळून सर्व्हीस रोडने ननावरे अंडरपासमार्गे वळवण्यात येणार आहे. पाषाणकडून सुस गावाकडे जाणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे उजवीकडे वळून सर्व्हीस रोडने ननावरे अंडरपासमार्गे सुपिरो ईलाइट सोसायटी ह्युंदाई शोरुममार्गे सुसगावकडे वळवण्यात येणार आहे. सुस गावकडून सुस ओव्हर ब्रीजमार्गे पाषाणकडे येणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे डावीकडे वळूक ह्युंदाई मार्गे सुपिरो ईलाइट सोसायटी ननावरे अंडरपास मुंबई बेंगळुरु हायवेलगत सर्व्हीस रस्त्याने पाषाण सुस रस्त्यावर येऊन पाषाणकडे वळवण्यात येणार आहे. पाषाणकडून कात्रजकडे जाणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे डावीकडे वळून सर्व्हीस रोडने १०० मीटर पुढे जाऊन मुख्य मुंबई बेंगळुरु राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर येऊन कात्रज अथवा साई चौकात डाव्या बाजुला वळून सुतारवाडीमार्गे मुख्य बेंगळुरु राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर येऊन कात्रजकडे वळवण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेकडून देण्यात आली.

Loksatta 20.06.20

## बाह्यवळण मार्गावर उड्डाण पुलाच्या कामासाठी वाहतूक बदल

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्गावर पाषाण भागात उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात येणार आहे. गुरुवारपासून (१८ जून) या परिसरातील वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

पाषाणकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक सूस पुलाच्या अलीकडे उजवीकडे वळवून सेवा रस्त्याने ननावरे भुयारी मार्गातून वळविण्यात येणार आहे. पाषाणकडून सूस गावाकडे जाणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे वळवून सेवा रस्त्याने भुयारी मार्गातून सुपिरो इलाइट सोसायटी हुंडाई शोरूम मार्गे सूसगाव अशी वळविण्यात आली आहे. सूस गावातून सूस पुलावरून पाषाणकडे येणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे डावीकडे वळवून हुंडाई शोरूम मार्गे सुपिरो इलाइट सोसायटी भुयारीमार्गे बाह्यवळण मार्गालगत सेवा रस्त्याने पाषाण-सूस रस्त्याने जाईल. तेथून पाषाणकडे वाहतूक वळविण्यात आली आहे. पाषाणकडून कात्रजकडे जाणारी वाहतूक पुलाच्या अलीकडे डावीकडे वळवून सेवा रस्त्याने मुख्य महामार्गावर वळविण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

Prabhat 10.06.20

# रिक्षात 'प्लॅस्टिक' पडदा नसल्यास कारवाई

## वाहतूक शाखेकडून बंधनकारक



**वडगावशेरी, दि. ९ (प्रतिनिधी)** - करोनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेचा उपाय म्हणून रिक्षाचालकांना रिक्षांमध्ये प्लॅस्टिक पडदा बसविण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. याची तपासणी वाहतूक शाखा पोलीस निरीक्षकांकडून (नियोजन) करण्यात येत असून पडदा नसलेल्यांवर कारवाईही करण्यात येत आहे.

करोनामुळे रिक्षा व्यवसाय तीन महिन्यांपासून बंद होता. अटी, शर्तींवर वाहतुकीस परवानगी मिळावी, अशी मागणी रिक्षा संघटनांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर रिक्षाचालक आणि प्रवासी यांची सुरक्षा राखली जावी, यासाठी परिवहन विभागाचे अधिकारी, वाहतूक विभागाचे पोलीस अधिकारी आणि रिक्षा संघटनांच्या प्रतिनिधींमध्ये झालेल्या चर्चेनुसार रिक्षाचालक आणि प्रवासी यांच्या सुरक्षिततेसाठी दोघांमध्ये प्लॅस्टिकचा पारदर्शक पडदा लावण्याबाबत निर्णय घेण्यात आला. रिक्षाचालक आणि प्रवासी यांच्यामध्ये हा पडदा असल्याने यातून प्रवासी आणि चालक यांच्यातील संभाव्य संसर्ग टाळण्यास मदत होत आहे. त्यामुळे रिक्षात असा पडदा नसताना रिक्षा चालविणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत आहे.

**Prabhat 06.06.20**

# कोथरूड वाहतूक विभागांतर्गत पार्किंगमध्ये बदल



पुणे, दि. ५ - शहरातील वाहतूक सुरळीत व्हावी, या हेतूने कोथरूड वाहतूक विभागांतर्गत पार्किंगबाबत काही बदल केले आहेत. पोलीस, अग्निशमन दल वाहने, रुग्णवाहिका वगळता बाकी सर्व वाहनांना याबाबतचे पालन करणे बंधनकारक आहे, वाहतूक शाखेचे अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी याबाबतचे आदेश दिले.

कोथरूड विभागांतर्गत हॅपी कॉलनी येथील १, २, ३ आणि ४ लेनसमोरील रस्त्यावर एका बाजूस नो-पार्किंग केली आहेत. यासह जिज्ञासा लर्निंग सेंटर ते सुतारदरा या रस्त्यावरील जिज्ञासा लर्निंग सेंटर समोर नो-पार्किंग केले आहे, अशी माहिती वाहतूक शाखेकडून देण्यात आली. याबाबत काही सूचना किंवा हरकती असल्यास नागरिकांनी १७ जूनपर्यंत येरवडा जेल रोड येथील पोलीस उपायुक्त कार्यालयामध्ये लेखी कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना आणि हरकती विचारात घेऊन अंतिम आदेश काढण्यात येतील, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

**Prabhat 25.06.20**

# 'हा' बेशिस्तपणा चालणार नाही!



पुणे : लॉकडाऊन काळात सिग्नल बंद असल्याने वाहनचालकांना शिस्तीची सवय राहिली नव्हती. आता शहरातील वाहतूक आता पूर्वपदावर येत आहे. त्यामुळे सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. दांडेकर पूल चौकातील हे दृश्य.